अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र





## मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा..!







## भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!


वर्ष ४८ वे

अंक १ ला

१० जानेवारी २०२६

किंमत १ रुपया

## स्नेहबंध च्या डिसेंबर मधील ‘तेव्हा काय झाले?’ या कार्यक्रमाची क्षणचित्रे...





## चित्तपावन उद्योजक मंचचा ZED सर्टिफिकेशन मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न.

## डॉ. प्रकाश जोशी यांची संस्थेस रु १० लाखांची देणगी



# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक - वार्षिक अहवाल (वर्ष २०२४-२५)

**सभासद संख्या -** अहवाल वर्षात ९४ नवीन सभासद झाले असून एकूण सभासद संख्या २६५८ पर्यंत झाली आहे.

**देणगीदार -** सदर अहवाल वर्षात अनेक दानशूर व सन्माननीय देणगीदारांनी देणग्या दिल्या. त्यात प्रामुख्याने श्री.रविंद बेडेकर, सौ. व श्री.शुभांगी दिलीप काटे, श्री.राजन दातार, प्रा.फडके, डॉ.पुष्कर लेले, वैजयंती साठे, जयंत जोगळेकर, हेमंत रानडे, हेमांगी गोखले, श्रीमती रोहीणी टकले, सीमा महेश घारपूरे, स्नेहलता करमरकर, शिरीष साठे, अंकुश रहाळकर, विष्णू रामचंद्र चितळे, श्री.देवेंद्र बापट सर्व सन्माननिय देणगीदारांचा उल्लेख शक्य नसल्याबद्दल क्षमस्व! तसेच सर्व देणगीदारांचे संस्थेच्या वतीने कृतज्ञता पूर्वक आभार.

**श्री परशुराम जयंती - वेदपुरस्कार सोहळा -** या वर्षीचा श्री परशुराम वेद पुरस्कार वितरण व अमृत महोत्सव सत्कार समारंभ दि.११ मे २०२५ रोजी प्रसाद मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची पार्श्वभुमी संस्थेचे विश्वस्त प्रा.दिलीप फडके यांनी मागील काळातील अमृत महोत्सव सत्कार कार्यक्रमांच्या आठवणी सांगितल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. प्रविण दवणे यांचा परिचय व साहित्य क्षेत्रातील योगदान या बाबत कार्यवाह श्री. नितीन सहस्त्रबुद्धे यांनी करून दिला. प्रा. प्रविण दवणे यांचा यथोचीत सत्कार प्रा.दिलीप फडके, प्रा.प्रभाकर केळकर, उपाध्यक्ष ॲड.अविनाश भिडे व कोषाध्यक्ष हेरंब घारपुरे यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते खालील वेदमूर्तींचा सत्कार करण्यात आला. श्री.विश्वेश्वर मोरेश्वर घैसास (ऋग्वेद), श्री.राहुल रमेश बेळे (यजुर्वेद), श्री.रीतेश जीवनराज कुलकर्णी (अथर्ववेद), श्री.अतुल लक्ष्मणराव सीतापती (सामवेद). वेदमूर्तींना श्री परशुराम वेद पुरस्कार अंतर्गत शाल, श्रीफळ, पगडी, श्री परशुराम प्रतिमा, पुष्पगुच्छ, सन्मान पत्र व रु.११,०००/- पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री राममंदीर अयोध्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात प्रमुख वेदमुर्तींमध्ये स्थान मिळालेले नाशिकचे सुपुत्र वेदमुर्ती श्री. शांताराम शास्त्री भानोसे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

या वर्षी एकूण २३ ज्येष्ठ सभासदांचा अमृत महोत्सव सत्कार प्रा.प्रविण दवणे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व श्री परशुराम प्रतिमा आणि गौरव पत्र देऊन करण्यात आला. गौरवपत्र व परीचय वाचन कार्यकारिणी सदस्य श्री. हेमंत वाड यांनी केले.

कार्यक्रमास संस्थेचे सदस्य श्री.अनिरुद्ध अभ्यंकर, श्री.सुधीर दामले, श्री.देवदत्त जोशी, डॉ.अमित कुमठेकर तसेच २२५ अधिक सभासदांची उपस्थिती होती. सदस्या सौ.सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांनी सर्वांचे आभार मानले व सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**सामुदायिक व्रतबंध सोहळा पुरेशी संख्येअभावी यावेळी रद्द करण्यात आला.**

स्नेहबंध मैत्रिणींचा या महिला मंचातर्फे अहवाल काळात विविध कार्यक्रम घेण्यात आले. जुन महिन्यात स्नेहबंध मैत्रिणींचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सौ.ज्योती पाटील, 'डिश गार्डन' तज्ञ यांनी २/३ वर्षे टिकतील अशी छोटी झाडे, वनस्पती, माती याबाबत समजावून सांगितले. याच बरोबर घर सजावटविषयी प्रात्यक्षिके करून दाखवली. श्री शंकराचार्य पीठातर्फे भगवद्गीता पाठांतर निमित्त सौ.धनदा देवधर यांचे अभिनंदन करण्यात आले.

नाशिकमध्ये गरजू विद्यार्थिनींसाठी शाळा चालवण्यात येते, चेन्नई येथील एनजीओ हा उपक्रम चालवतो. शाळेच्या पदाधिकारी श्रीमती कृष्णमुर्ती यांनी महिला मंडळ मैत्रिणींनी माहिती दिली. श्रावण महिन्यात हळदी कुंकू समारंभ संपन्न झाला.

**गणेशोत्सव :-** श्री गणेश प्राणप्रतिष्ठा श्री. हेमंत वाड यांचे हस्ते करण्यात आली. श्री. गौरव जोगळेकरांनी पौरोहित्य केले. प्रतिमेचे पूजन करून पवमान अभिषेक केला.

**शारदीय नवरात्रोत्सव :-** ३० ऑक्टो २०२५ रोजी श्री महालक्ष्मी अष्टमी पूजन प्रसाद मंगल कार्यालयात संपन्न झाले. पाऊस असून देखील मोठ्या संख्येने सभासद बंधू-भगिनींनी उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले. पूजार्थींनी पारंपारिक वेशात प्राणप्रतिष्ठा केली. श्रीमती विद्या दुगल यांनी पूजेविषयी सविस्तर माहिती सांगितली व श्री.जोगळेकर गुरुजींनी पूजा सांगितली.

सौ.क्षिप्रा सहस्त्रबुद्धे व सौ. गार्गी नातू यांनी देवीचा सुबक मुखवटा बनवला. संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा झाल्यावर देवीचा साजश्रृंगार करण्यात आला. धुप, उद, सुवासात श्री सुक्त पठण,

भजन, गायन, जोगवा. टिपऱ्या सादर करण्यात आला.

जगदीश व देवदत्त जोशी कुटुंबियांचे पूर्ण सहकार्य मिळाले. पोलीस आयुक्त मा. संदिप कर्णिक यांनी विशेष उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

**महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा) :–** चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक यांच्या 'स्नेहबंध मैत्रिणींचा' ह्या मंडळाचा १२ वा वर्धापनदिन २७ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. दीप प्रज्वलन संस्थेचे विश्वस्त प्रा.दिलीप फडके, श्री.केळकर, अध्यक्ष श्री.विजय साने, प्रमुख पाहुण्या सौ.अनिता दाते–केळकर व सत्कारार्थी श्री.म्हारसे यांनी केले. महिला वर्गाच्या प्रत्येक कार्यक्रमातील लक्षणीय उपस्थिती व वर्षभरात चालणाऱ्या कार्याची प्रशंसा अध्यक्ष श्री.विजय साने यांनी केली. तारांगण संस्थेची माहिती श्री.म्हारसे यांनी करून दिली.

९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २६ नोव्हेंबर २५ रोजी संस्कृती बँक्वेट हॉल, बेळगाव ढगा येथे आयोजित करण्यात आली.

**श्री परशुराम भवन बांधकाम : –** श्री परशुराम बांधकाम बेसमेंट, तळमजला जानेवारी २४ अखेर पूर्ण झाले. स्वागत/प्रास्ताविक अभय खरे यांनी केले तर श्री.अभ्यंकर यांनी आभार प्रदर्शन केले.

**आर्थिक शैक्षणिक व वैद्यकिय मदत : –**

संस्थेच्या विविध योजनांतर्गत गंभीर स्वरूपाच्या आजारा–साठी तसेच हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व गरजूंसाठी शिधा वाटप योजनेअंतर्गत अहवाल सालात शैक्षणिक, वैद्यकिय, शिधावाटप व इतर आर्थिक मदती अंतर्गत अनेकांना मदत करण्यात आली आहे.

**श्रध्दांजली :–** या अहवाल वर्षात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा दिवंगत झालेल्या सभासदांना आणि कुटुंबातील सदस्यांप्रती संस्थेच्या वतीने भावपूर्ण विनम्र श्रध्दांजली.

**आभार :–** श्री भगवान परशुराम आणि ज्येष्ठांच्या कृपाशिर्वाद, तसेच विश्वस्त आणि ज्येष्ठ सभासदांच्या मार्गदर्शनाने यशस्वी वाटचाल अशीच सातत्याने निरंतर चालू राहो. सहकार्य सदोदित लाभत आहेच. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. भविष्यातही अशीच साथ लाभो हीच श्री परशुराम चरणी प्रार्थना, धन्यवाद!

**– नितीन सहस्रबुध्दे (कार्यवाह)**




**पराग वैशंपायन**
फोटोग्राफर
**क्षणांचे सौंदर्य कॅमेऱ्यातून टिपतो..**
**आनंदी क्षणांच्या आठवणी आपुलकीने जपतो..**

* साखरपुडा फोटोग्राफी/व्हिडिओ
* प्रिवेडिंग फोटोशूट/व्हिडिओ
* ट्रेडिशनल वेडिंग फोटोग्राफी
* वेडिंग कँडिड फोटोग्राफी
* वेडिंग ट्रेडिशनल व्हिडिओ
* सिनेमॅटिक वेडिंग व्हिडिओ
* बेबीशॉवर शूट

आधुनिक उपकरणांसह तरबेज टीम
**ऑफीस : प्रभूशिल्प अपार्टमेंट, तपोवन रोड, नाशिक**
**9225762400 / 9405360834**

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## अंदाज पत्रक २०२६-२७

| तपशील | अनऑडिटेड खर्च नोव्हें. २०२५ पर्यंत | अंदाज २०२६-२७ | अनऑडिटेड उत्पन्न नोव्हें. २०२५ पर्यंत | अंदाज २०२६ -२७ करिता |
|---|---|---|---|---|
| ऑफिस जागा भाडे | १,५०,००० | ० | २०,१०,००० | ३५,५०,००० |
| **देणगी** | - | - | - | - |
| र. के. पटवर्धन परशुराम भवन | १,१०,८०,९३४ | - | ६२,८७,९०५ | ३०,००,००० |
| काका गद्रे प्रकल्प - अंजनेरी | - | - | - | ५,००,००० |
| इतर | - | ३०,००० | - | ५०,००० |
| **शैक्षणिक मदत** | - | - | - | - |
| शैक्षणिक निधी (वह्या) | १२,६७२ | ५०,००० | ३,२४० | २०,००० |
| शैक्षणिक निधी (पुस्तके) | ३,०१५ | ३५,००० | - | - |
| शिष्यवृत्ती | ४५,००० | २,००,००० | - | १,००,००० |
| फी | - | ५०,००० | - | - |
| उत्सव सत्कार सभारंभ | ६,७७,०२९ | २,००,००० | - | ७५,००० |
| वीज खर्च | १,२३,०५० | १,७५,००० | - | - |
| टेलिफोन खर्च | २४,६२७ | २०,००० | - | - |
| पोस्टेज (टपाल) खर्च | २९,५९७ | ४७,००० | - | - |
| **प्रिंटींग खर्च** | ८,५७२ | - | - | - |
| चित्तपावन मित्र छपाई | १,३०,५५३ | २,००,००० | - | - |
| ऑफिस स्टेशनरी | २,२०५ | १०,००० | - | - |
| जाहिरात | - | १०,००० | १९,५५० | २५,००० |
| न्यायालयीन खर्च | १,०२,००० | १,५०,००० | - | - |
| किरकोळ खर्च | ५४,०९८ | - | - | - |
| वधू वर सूचक | - | - | ५,५०० | १०,००० |
| **सभासद वर्गणी** | - | - | ६६,००० | ८०,००० |

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## अंदाज पत्रक २०२६-२७

| तपशील | अनऑडिटेड खर्च नोव्हें. २०२५ पर्यंत | अंदाज २०२६-२७ | अनऑडिटेड उत्पन्न नोव्हें. २०२५ पर्यंत | अंदाज २०२६ -२७ करिता |
|---|---|---|---|---|
| मिटींग | ४,९२० | १०,००० | - | - |
| साफसफाई | ३५,६९० | ८५,००० | - | - |
| रिपेरींग मेंटेनन्स | २८,३९३ | ३०,००० | - | - |
| आर्थिक मदत | १,२४,५०० | २,००,००० | - | - |
| वैद्यकिय मदत | ६२,३०० | १,५०,००० | - | - |
| पगार - मानधन | १,७८,६०० | २,४०,००० | - | - |
| **र. के. पटवर्धन परशुराम भवन** | - | **३०,००,०००** | - | - |
| सोलर सिस्टीम | - | - | - | - |
| पावर बॅकअप | - | - | - | - |
| मास्टर प्लॅन | - | - | - | - |
| बिन शेती कर (N.A.) | १८,२०० | २०,००० | - | - |
| काका गद्रे स्मृती प्रकल्प | - | २०,००,००० | - | - |
| नगरपालिका कर | - | ४०,००० | - | - |
| अकौंटिंग चार्जेस | १५,००० | १५,००० | - | - |
| वर्ष २०२६-२७ अखेर बँक शिल्लक | - | ४,४३,००० | - | - |
| **एकूण** | | **७४,१०,०००** | | **७४,१०,०००** |

## डॉ. प्रकाश जोशी यांची संस्थेस रु १० लाखांची देणगी

नाशिक मधील प्रथितयश पोट विकार तज्ञ डॉ.प्रकाश जोशी यांनी २६ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेस भेट देऊन शैक्षणिक उपक्रमांसाठी रु १० लाखांची देणगी दिली. या देणगीचा विनियोग विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी व्हावा असा त्यांचा मानस आहे. डॉ प्रकाश जोशी कुटुंबीयांचे संस्थे तर्फे मनःपूर्वक आभार.

***

## स्नेहबंध चा डिसेंबर मधील कार्यक्रम – तेव्हा काय झाले?

२७ डिसेंबर रोजी 'तेव्हा काय झाले?' हा विषय मैत्रिणींसाठी आयोजित केला होता. बऱ्याच मैत्रिणींनी सहभाग नोंदवला. खरं तर हा विषयच असा आहे की जीवनात प्रत्येकीला अनुभव आला असेलच आणि आपण ते कुणाला तरी सांगावे, आणि कुणीतरी ते ऐकावे असे वाटतेच, त्यात काही विशेष सांगण्यासारखं असेल तर नक्कीच भावविश्व उलगडतं. मग आपण व्यक्त होतो.

बऱ्याच मैत्रिणींनी अनुभव अगदी भान हरपून सांगत होत्या. कुणी विमानतळावर कशी घालमेल झाली, कुणी मुंबईतल्या बॉंब स्फोटातील थरारक प्रसंग, कोणी समुद्राला अवचित आलेल्या उधाणाचा, प्रवासातले अनुभव, विस्मयकारक प्रसंग, वस्तू हरवल्यावरची विमनस्क स्थिती, गूढ प्रसंग अशा विविध प्रसंगांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. यात निशिगंधा घाणेकर, श्रीप्रिया मराठे, मानसी आपटे, आशा पाटणकर, सुनीता परांजपे, ऐश्वर्या साने, चित्रा जोशी, अश्विनी दामले, स्वाती काळे, सुवर्णा महाबळ, नीलिमा दांडेकर, गीता आगाशे, सुनिता परांजपे, स्नेहल साठे अशा उत्साही मैत्रिणींना आपला सहभाग नोंदवला.

मंगलाताईंनी सूत्र संचालन केलं. तर मैथिली गोखले यांनी छान विनोदी प्रसंग सांगत समारोप केला. स्नेहबंध तर्फे प्रत्येक वक्त्या मैत्रिणीला चॉकलेटची ट्रीट मिळाली. आणि सर्वांना छान गरम कॉफीपानानंतर आजचा कार्यक्रम संपन्न झाला.

## निसर्ग...

*वृक्षवल्लींच्या नेपथ्यावरी*
*टुमदार देखणे घर कौलारू ।*
*हिरवाईच्या मखमालीवर*
*जरतारी मातीची लाल जरा !!*
*निवांत परिसर, निर्मळ हवा*
*वाट वाकडी, वळसे जरा ।*
*एकांतातील कुजबूज ओठी*
*सावध द्विज ऐकतील जरा ॥*
*अनुपम सौंदर्याचा,*
*अविष्कार निसर्गाचा,*
*पक्षीगण गातात गीत सृष्टीचे ।*
*आयुष्याच्या संध्या समयी*
*सान्निध्य निसर्गाचे असावे जरा ॥*

*(यशवंत दाते)*

आजीबाईच्या बटव्यातील अनुभवसिध्द आणि परंपरागत
पुष्कर आयुर्वेदचा
ओवार्क


*अपचन *भूक न लागणे
*ॲसिडिटी *जुलाब
*पोटदुखी *गॅस ट्रबल
*करपट ढेकरा
इत्यादींवर गुणकारी
ओवार्कात आहे
ओवा, मिरी, मीठ
आणि हिंग इत्यादी
*सर्व वयोगटातील व्यक्तींकरिता फायदेशीर आहे. *ओवार्क समप्रमाणात ताकाबरोबर घ्यावा म्हणजे उत्तमच !!!
आजच संपर्क करा:-पुष्कर आयुर्वेद,
अन्नपूर्णा बंगला, टि.व्हि. टॉवर रोड, मॅक्सकेअर हॉस्पिटल समोर, बदलापूर (पूर्व)
9819054510,9421631618 (जोशी बंधू)

# चित्तपावन उद्योजक मंचचा ZED सर्टिफिकेशन मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न.

ZED सर्टिफिकेशन मार्गदर्शन – उद्योजक मंच चा डिसेंबर मधील कार्यक्रम. चित्तपावन उद्योजक मंचचा या वर्षीचा चौथा कार्यक्रम १६ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमातील प्रमुख वक्ते श्री. योगेश देशपांडे यांनी ''A to Z About ZED'' या विषयावर मार्गदर्शन केले.

श्री.योगेश देशपांडे हे स्वतः सर्टिफाइड लीड ऑडिटर असून गेल्या २३ वर्षात त्यांनी ३५० हून अधिक उद्योगांना मार्गदर्शन केले आहे.कार्यक्रमात योगेश सर यांनी ZED संदर्भात सांगितलेले काही ठळक मुद्दे –

✻ २०२२ पासून सुरू झालेल्या भारत सरकारच्या या उपक्रमात आत्तापर्यंत ४ लाखांहून अधिक MSME सहभागी झाल्या असून ६१३ कोटींहून अधिक आर्थिक मदत या द्वारे MSMEs ना मिळालेली आहे.

- ✻ Manufacturing कंपनी ZED सर्टिफिकेशन करू शकतात.
- ✻ ब्राँझ, सिल्वर आणि गोल्ड अशा ३ प्रकारचे सर्टिफिकेशन असते.
- ✻ अत्यंत अल्प खर्चात हे सर्टिफिकेशन प्राप्त होते.
- ✻ प्रत्येक सर्टिफिकेशन मध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सब्सिडी मिळतात त्यात expert कन्सल्टन्सी च्या मार्गदर्शन खर्चात देखील सवलत मिळते.
- ✻ Gov. बँक्स च्या लोन वरील इंटरेस्ट रेट मध्ये देखील सवलत मिळते.
- ✻ ही सर्व प्रणाली डिजिटल असून येणारी सबसिडी देखील डायरेक्ट अकाऊंट मध्ये जमा होते.

कार्यक्रमात उपस्थित अनेक उद्योजकांनी या सर्टिफिकेशन बद्दल विविध प्रश्न विचारले व त्याची समर्पक उत्तरे योगेशजीनी दिली. या सर्टिफिकेशन चा सर्वाधिक फायदा मायक्रो इंडस्ट्रीसना आहे असे मत या वेळी योगेशजीनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. विनायक गोखले यांनी अंकुर विद्या मंदिर शाळेविषयी माहिती दिली व सर्वांना शाळेच्या मदतीसाठी देणगी प्रवेशिकेच्या माध्यमातून होणाऱ्या लोक रामायण या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

प्रथेप्रमाणे राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमासाठी श्री. देवेंद्र बापट व श्री. विवेक गोगटे यांच्या मार्गदर्शनात मंचाचे सभासद श्री. अमित देवधर, व श्री. पियुष देसाई यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच श्री. मंदार गोखले, श्री. प्रणव काळे, श्री. मंगेश बापट, श्री. दीप भागवत, श्री. हेरंब घारपुरे यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले.

– पीयुष देसाई



## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमार चंद्रहास मकरंद सोमण**<br>१५९२, रामविलास सोसायटी, सदाशिव पेठ, पुणे<br>मोबा.: ९८८१३७५५६२ | २९/१०/१९९३ | शांडिल्य | ५'.७'' | MS Electronic | ८०० डॉलर प्रति महिना |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## इतर देणगीदार - डिसेंबर २०२५

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | डॉ. श्री. प्रकाश हरी जोशी | १०,००,०००/- |
| ०२ | श्री. सुधाकर अनंत जोशी | ७५१/- |



## नामजप...

*नामजप सदा, राहो ओठांवर या । नित्य निरंतर, ध्यान तुझे ॥*

*छंद नामाचा, सुखावतो जिवा । लाभतो विसावा, आत्म्यास ॥*

*मिटल्या डोळ्यांत, दिसे तुझे रूप । परब्रह्म स्वरूप, निराकार ॥*

*डोळा तुझे ध्यान, नाम तुझे कानी । आणिक जीवनी, नको काही ॥*

*तुझे गुण गाया, कवने करतो । शब्दांनी भरतो, रिती ओंजळ ॥*

*शब्दरूप संपदा, असो निरंतर । न पडो विसर तुझ्या कृपेचा ॥*

*अशीच राहो देवा, भक्तांवर माया । पांडुरंगा सखया, भगवंता ॥*

**- मकरंद फडके**



## स्नेहबंध मैत्रिणींचा - आगामी कार्यक्रम....
## हळदीकुंकू व तिळगूळ समारंभ



*नवीन आंग्ल वर्षाच्या समस्त मैत्रिणींना शुभेच्छा......*

*नवीन सभासद झालेल्या आणि आधीच्या आहेत त्यांनी आपल्या संस्थेच्या उपक्रमात आपली हजेरी लावावी. त्या निमित्ताने नवीन ओळखी, मैत्रिणी होतील.*

*शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी आपल्या स्नेहबंध मैत्रिणींचा हळदीकुंकू व तिळगूळ समारंभ आहे. तरी जास्तीत जास्त मैत्रिणींनी उपस्थित रहावे... त्या दिवशी मजेदार खेळ खेळणार आहोत. नवीन वर्षांत नवीन उपक्रमाची माहिती मिळेल.*

**ठिकाण :** 'परशुराम भवन', **वेळ :** ५.३० ते ७.०० पर्यंत.

# इंग्रजी नविन वर्ष 2026

नविन वर्ष आपणांस

सुखाचे, समाधानाचे, ऐश्वर्याचे,

आनंदाचे, आरोग्याचे जावो!

येत्या नविन वर्षात आपले

जीवन आनंदमय आणि सुखमय होवो,


हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

नूतन वर्षाभिनंदन


...आम्ही फक्त सोनं विकत घेतो
संपर्क: पवित्र टकले
९८२२०५७०००
तुमच्या जुन्या सोन्याला सर्वोत्तम दर
टकले
ओल्ड गोल्ड
६०१, ६वा मजला, सिद्धी पूजा
बिजीनेस स्क्वेअर, लेले हॉस्पिटल
मागे, कुलकर्णी गार्डन जवळ,
शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२

## धुंधुर्मास भोजन

२०२६ चा धुंधुर्मास सहभोजनाचा कार्यक्रम या वर्षी संस्थेची नूतन वास्तू श्री परशुराम भवन येथे सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. भोजन पास मूल्य प्रति व्यक्ती रु. १००/- असून १५ डिसेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ पर्यंत (रविवार सोडून) संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील. जास्तीत जास्त सभासदांनी यात सहभागी व्हावे.




## ✻ संस्थेच्या कार्यालय वेळेत बदल ✻

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक या आपल्या संस्थेच्या ऑफिस ची वेळ दि. १ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी १० ते दुपारी २ व दुपारी ४ ते रात्री ८ अशी करण्यात आलेली आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

### संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.